स्थानिक गुन्हे शाखा जळगाव

प्रेस नोट

दिनांक 29/04/2025

प्रति,

मा.संपादक

विषय- दुचाकी चोरणाऱ्या 02 आरोपीस जेरबंद करून 02 दुचाकी जप्त स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई.

जळगाव शहरात दिनांक 16/04/2025 रोजी सायंकाळी 19.00 वा पंकज सरदार राजपुत रा.पिंप्राळा, जळगाव याचे मालकीचे हिरो शाईन एम.एच.19 डी .एस 1534 अशी मोटरसाईकल जळगाव रेल्वे स्टेशन येथुन चोरी झाली होती तसेच दिनांक 19/04/2025 रोजी दुपारी 02.00 वा दरम्यान अब्दुल फारूक खलील देशमुख रा.फातीमा नगर जळगाव यांची हिरो होंडा शाईन एम.एच.19 बी.वाय 2123 अशी बळीराम पेठजळगाव येथुन चोरी झाली या बाबीत जळगाव शहर पोलीस स्टेशन येथे 01) गुरनं 147/2025 02) GRP जळगाव येथे 173/2025 भा.न्या.सं 303(2) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचे गुन्हे उघडकीस येणे कामी मा.पोलीस अधीक्षक श्री.महेश्वर रेड्डी सो.यांचे आदेश झाले होते त्याप्रमाणे सदर गुन्हयाचा तपास सुरू असतांना आज दिनांक 29/04/2025 रोजी गोपनीय माहिती मिळाली कि, मन्यारखेडा गावातील 01) मयुर उर्फ गोल्या बाबुलाल सांळुखे 02)रामचंद कमलचंद भिल दोन्ही रा. मन्यारखेडा ता.जि.जळगाव यांनी सदरचे मोटर सायकल चोरल्या आहेत बाबतची माहिती मिळाल्याने त्यास आज रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्यांना मन्यारखेडा येथुन ताब्यात घेउन चौकशी केली असता त्यांनी सदरचे गुन्हे केल्याचे कबुल करुन चोरी केलेल्या 02 मोटर सायकल ह्या जप्त करण्यात आलेल्या आहेत सदर आरोपीचे यापुर्वी कुठलेही गुन्हेगारी रेकॉर्ड नसतांना मिळालेल्या गोपनिय माहिती वरून सदरचे 02 गुन्हे उघडकीस आले आहेत.

सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री.महेश्वर रेड्डी सो, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.अशोक नखाते, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी संदिप गावीत सो, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठपोलीस निरिक्षक बबन आव्हाड सो, पो.उपनिरी शरद बागल , सफौ.विजयसिंग पाटील, अतुल वंजारी, राजेश मेंढे संजय हिवरकर, सुधाकर अंभोरे, अक्रम शेख, विजय पाटील, हरिलाल पाटील, रणजित जाधव, राहुल महाजन, प्रदिप चौरे, अशानी केली असुन कारवाईकामी नेत्रमचे पोकॉ.कुदनसिंग बयास यांनी सहकार्य केले आहे.आरोपी यास पुढील कार्यवाही कामी जळगाव शहर पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात येत आहेत.

(बबन आव्हाड)<br>
वरिष्ठ पोलीस निरीक्षक ,<br>
स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव

